| | | |
|---|---|---|
| MHRT100006872022 | प्रकरण दाखल तारीख | २१/१०/२०२२ |
| | प्रकरण नोंदल्याची तारीख | २१/१०/२०२२ |
| | निकाल दिनांक | ०६/०३/२०२६ |
| | कालावधी | वर्षे महीने दिवस<br>०३ ०४ १३ |

| | |
|---|---|
| **भाग 'अ'**<br>**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परीच्छेद (I) )**<br>**राजापूर येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात**<br>**(पिठासिन अधिकारी - श्रीमती एस. एस. हाके)** | |
| **नियमित फौजदारी खटला क्र.६१/२०२२** | **निशाणी क्र.६०** |
| **खटला क्रमांक** | **नियमित फौजदारी खटला क्र.६१/२०२२** |
| **गुन्हा रजिस्टर क्रमांक व पोलिस ठाणे अथवा राज्य उत्पादन शुल्क** | गु.र.क्र.१७७/२०२२, राजापूर पोलीस ठाणे ता. राजापूर, जि. रत्नागिरी |
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र शासनतर्फे राजापूर पोलीस ठाणे** |
| **प्रतिनिधीत्व** | **सरकारी अभियोक्ता श्री. बी. एस. सुपेकर.** |
| **विरुध्द** | |
| **आरोपी** | **अनंत मधुसुदन प्रभुदेसाई**<br>वय – ४२ वर्षे, धंदा - शेती,<br>रा. तळवडे, बाजारवाडी,<br>सध्या रा. पाचल, बाजारपेठ, ता.राजापूर,<br>जि. रत्नागिरी. |
| **प्रतिनिधीत्व** | **विद्वान विधीज्ञ श्री. एम. व्ही. मांडवकर.** |

भाग ब

(फौजदारी नियमावली प्रकरण परीच्छेद ४४ **(II)**)

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | २७/०९/२०२२ |
| फिर्याद पोलिस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | २७/०९/२०२२ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | २१/१०/२०२२ |
| आरोपीविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख | २४/०१/२०२३ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | ०५/०९/२०२४ |
| निकालाची तारीख | ०६/०३/२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | संबंधीत नाही. |

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडलेची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ संपरिक्षेचे दरम्याने निरुध्द केलेल्या कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनंत मधुसुदन प्रभुदेसाई | आरोपीस फौ.प्र.सं. कलम ४१अ(१) प्रमाणे नोटीस दिली. | २०/१२/ २०२२ | भा.दं.वि.क. ३२३, ३२४, ५०४, ५०६. | आरोपीस निर्दोष मुक्त केले. | लागू नाही. | -------- |

भाग क

(फौजदारी नियमावली प्रकरण परीच्छेद ४४ **(III))**

**साक्षीदारांची यादी**

**अ. सरकारी साक्षीदारांची यादी**

| साक्षीदार क्रमांक | नाव | (पुराव्याचे स्वरुप ) साक्षीदाराची भुमीका | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| साक्षीदार क्र.१ | वनिता भिकाजी जाधव | फिर्यादी साक्षीदार | २० |
| साक्षीदार क्र.२ | शिवराम बुधाजी कोटकर | पंच साक्षीदार | २६ |
| साक्षीदार क्र.३ | विलास केशव नारकर | पंच साक्षीदार | २९ |
| साक्षीदार क्र.४ | सचिन शांताराम रांबाडे | पंच साक्षीदार | ३१ |
| साक्षीदार क्र.५ | प्रज्ञा प्रमोद कांबळे | इतर साक्षीदार | ३६ |
| साक्षीदार क्र.६ | सारिका प्रभाकर जाधव | इतर साक्षीदार | ३७ |
| साक्षीदार क्र.७ | डॉ. राजकुमार शिवाजीराव चव्हाण | वैदयकीय अधिकारी | ४० |
| साक्षीदार क्र.८ | कमलाकर रघुनाथ तळेकर | तपासी अधिकारी | ४३ |

**ब. बचावाचे साक्षीदार - निरंक**

**क. अभियोगपक्षाच्या / बचावपक्षाच्या कागदपत्रांच्या निशाणींची यादी**

**अभियोगपक्षाच्या कागदपत्रांच्या निशाणींची यादी**

| अनु.क्र. | कागदपत्रांचे वर्णन | निशाण |
|---|---|---|
| १ | फिर्याद | २१ |
| २ | घटनास्थळ पंचनामा | २७ |
| ३ | पंचनाम्यावरील पंचाच्या सहीस | ३० |
| ४ | पंचनाम्यावरील पंचाच्या सहीस | ३२ |
| ५ | वैदयकीय प्रमाणपत्र | ४१ |
| ६ | घटनास्थळाचा नकाशा | ४४ |
| ७ | भारतीय पुरावा कायदा कलम ६५ब चे प्रमाणपत्र | ४५ |
| ८ | आरोपीस दिलेली फौ.प्र.सं. कलम ४१अ प्रमाणेची नोटीस | ४६ |
| ९ | जप्ती पंचनामा | ४७ |
| १० | मुद्देमाल पावती | ४८ |

बचावपक्षाच्या कागदपत्रांच्या निशाणींची यादी **-** निरंक**.**

**मुद्देमाल**

| मुद्देमाल वस्तू क्र. | वर्णन |
|---|---|
| **१.** | एक लोखंडी पाते असलेला बोडसा (कोयता) त्याचे पात्याची लांबी पावणे अकरा इंच असून पुढील टोक वक्राकार व निमुळते व त्याचे आतील बाजूला धार आहे. सदर बोडसा (कोयता) याची मुठ भगव्या रंगाची प्लॅस्टीकची असून तिची लांबी सव्वा पाच इंच असलेला जुना वापरता त्याची किंमत रु.१५०.००/-. |

## न्यायनिर्णय
## (घोषणा दिनांक ०६/०३/२०२६)

**०१.** प्रस्तुतचा खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान (यापुढे थोडक्यात 'भा.दं.वि.' असे संबोधले आहे.) चे कलम ३२३, ३२४, ५०४, ५०६ अन्वये शिक्षापात्र अपराधासाठी दाखल करण्यात आलेला आहे.

**<u>अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे -</u>**

**०२.** दि.२७/०९/२०२२ रोजी सकाळी ०८.३० वाजण्याच्या दरम्याने मौजे तळवडे, गुरववाडी येथील ठिकाण टेंब, कोंड्याचा माळ, ता. राजापूर येथील त्या कसत असलेल्या जमिनीमध्ये बोडश्याने (कोयत्याने) साफसफाई करीत असताना यातील आरोपी याने तेथे येवून फिर्यादी यांना शिवीगाळ करुन त्यांचे जमिनीला केलेली लाकडी वय (कुंपण) तोडू लागला. त्यावेळी फिर्यादी यांनी त्याला 'तु वय तोडणारा कोण' असे विचारले असता त्याने फिर्यादी यांना 'मी तुझा बाप आहे' असे म्हणून फिर्यादी यांचे अंगावर धावत येवून तिचे डावे कानाजवळ गालावर व डोक्यात मागे हाताचे थापटाने मारहाण केली. त्यावेळी त्या खाली जमिनीवर पडल्या असता आरोपी याने फिर्यादी यांचे हातातील बोडसा (कोयता) हिसकावून घेवून फिर्यादी यांचे उजवे हाताचे अंगठयावर मारला व फिर्यादी यांचे बोडसे (कोयता) त्याचे हातात घेवून 'जर परत तु या जमिनीत आलीस तर तुला खल्लास करुन टाकीन' असे म्हणून शिवीगाळी केली. त्यामुळे आरोपींविरुध्द पोलिसांत फिर्याद भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२३, ३२४, ५०४, ५०६ या गुन्हयाअंतर्गत गुन्हा क्र.१७७/२०२२ दाखल केला.

**०३.** ठाणे अंमलदार राजापूर यांनी त्यानंतर आरोपी विरुध्द वर नमूद कलमाच्या अपराधाकरीता गुन्हा क्र.१७७/२०२२ नोंदविला आणि त्याचा तपास अधिकारी के. आर. तळेकर, पोहवा/६०३, राजापूर पोलीस ठाणे यांनी केला. तपासादरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदविले. त्यानंतर तपासाअंती आरोपी विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

**०४.** आरोपी विरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२३, ३२४, ५०४, ५०६ अन्वये अपराधाकरीता निशाणी क्र.०९ नुसार आरोपीस दोषारोप वाचून समजावून सांगितले असता आरोपीने त्यास गुन्हा कबूल नसल्याचे निशाणी क्र.१० वरील निवेदनान्वये सांगितले त्यामुळे प्रकरण पुढे चालविण्यात आले.

**०५.** अभियोगपक्षातर्फे एकूण आठ साक्षीदारांची साक्ष नोंदविली. त्यानंतर अभियोगपक्षाचा तोंडी विनंतीवरुन पुरावा बंद करण्यात आला. सदर साक्षीपुराव्यावरुन आरोपीचे फौजदारी प्रक्रीया संहिता ३१३ अन्वये निवेदन(निशाणी क्र.५७) नोंदविण्यात आले.

**०६.** अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्यावरुन दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला असता खालील मुद्दे निदर्शनास येतात त्यावरील निष्कर्ष व कारणमिमांसा पुढीलप्रमाणे -

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि.२७/०९/२०२२ रोजी सकाळी ०८.३० वाजण्याच्या दरम्याने मौजे तळवडे, गुरववाडी येथील ठिकाण टेंब, कोंड्याचा माळ, ता. राजापूर येथे ती कसत असलेल्या जमिनीमध्ये आरोपी याने फिर्यादी यांचे अंगावर धावत येवून तिचे डावे कानाजवळ गालावर व डोक्यात मागे हाताचे थापटाने मारुन जाणुनबुजून दुखापत केली आणि अशाप्रकारे भा.दं.वि.कलम ३२३ नुसार गुन्हा केला असे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे काय ? | **नाही.** |
| २. | वर नमुद दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपी याने फिर्यादी यांचे हातातील बोडसा (कोयता) हिसकावून घेवून फिर्यादी हिचे उजवे हाताचे अंगठयावर मारुन जाणुनबुजून दुखापत केली आणि अशाप्रकारे भा. दं.वि.कलम ३२४ नुसार गुन्हा केला असे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे काय ? | **नाही.** |
| ३. | वर नमुद दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करुन तिचा हेतुपुरस्सर अपमान करुन सार्वजनिक शांततेचा भंग केला आणि अशाप्रकारे भा. दं.वि.कलम ५०४ नुसार गुन्हा केला असे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे काय? | **नाही.** |
| ४. | वर नमुद दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपीले फिर्यादी जीवे मारण्याची धमकी दिली आणि अशाप्रकारे भा. दं.वि.कलम ५०६ नुसार गुन्हा केला असे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे काय ? | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ५. | आरोपीने कोणता अपराध केल्याचे शाबीत झाले आहे काय ? | **आरोपीस दोषमुक्त करण्यात येते.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ५ करीता -</u>**

**०८.** वरील मुद्दा क्र.१ ते ५ हे एकमेकांशी निगडीत असल्याने पुराव्याची होणारी पुनरावृत्ती टाळण्यासाठी मुद्दा क्र.१ ते ५ हे विवेचनाकरीता एकत्रात घेण्यात येत आहेत.

**०९.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार वनिता जाधव (अ.सा.क्र.१) या फिर्यादी साक्षीदार असून त्यांचा निशाणी क्र.२० येथे नोंदविलेल्या सरतपासामध्ये त्यांनी असे कथन केले आहे की, दि.२७/०९/२०२२ रोजी सकाळी ०८.३० वाजताचे दरम्याने ते त्यांच्या शेतीमध्ये साफसफाई करण्याकरीता गेले होते त्यावेळी अनंत मधुसुदन प्रभुदेसाई हे त्यांच्या शेताचे कुंपण तोडू लागले म्हणून त्यांनी विचारले की, कोण आहे, कोण आहे, त्यावेळी ते म्हणाले की, ‘मी तुझा बाप आहे’. त्यावेळी अनंत याने त्यांचे कानाखाली मारले व डोक्यावर हाताच्या थापटाने मारले व त्यांना शिवीगाळ केली. त्यानंतर ते जमिनीवर खाली पडले. त्यावेळी अनंत याने त्यांच्या हातातील कोयता हिसकावून घेतला व त्यांच्यावर वार केला. त्यावेळी त्यांनी उजव्या हाताने तो वार अडविला असता अनंत याच्या हातातील कोयता त्यांच्या उजव्या तळहाताच्या अंगठयाच्या खाली लागला. त्यानंतर त्यांना शितल कोटकर या पोलीस पाटील यांनी रायपाटण येथील सरकारी दवाखान्यात उपचाराकरीता नेले. तेथे त्यांचेवर उपचार केल्यानंतर रायपाटण येथील सरकारी दवाखान्यामध्ये पोलीसांनी येवून फिर्याद (नि.क्र.२१) दिली.

**१०.** सदर साक्षीदार वनिता जाधव (अ.सा.क्र.१) हिने आरोपीतर्फे घेणेत आलेल्या उलटतपासामध्ये हे मान्य केले की, अनंत प्रभुदेसाई हे तळवडे गावचे खोत आहेत, अनंत प्रभुदेसाई यांचे विरुध्द त्यांनी पोलीस ठाण्यामध्ये पूर्वीच बऱ्याच तक्रारी

दाखल केलेल्या आहेत, त्यांनी यापूर्वी अनंत प्रभुदेसाई यांनी त्यांना जातीवाचक शिवीगाळ केली म्हणून जी केस दाखल केली होती ती केस प्रस्तुत केस करताना रत्नागिरी येथे चालू होती, अनंत प्रभुदेसाई यांच्या जमिनीमध्ये ते कुळ आहे हे ठरवून मिळणेकरीता त्यांनी तहसिलदार, राजापूर यांचेकडे कुळ कायदा कलम ७०ब खाली अर्ज दाखल केलेला आहे, सदर जमिनीमध्ये ते कुळ नाही असे अनंत यांचे म्हणणे आहे, या न्यायालयामध्ये रे.दि.मु.नं.४७/२०१९ हा अनंत प्रभुदेसाई यांनी त्यांचे विरोधात ताकीदीकरीता दाखल केलेला आहे, रे.दि.मु.नं.४७/२०१९ या दाव्यामध्ये अनंत प्रभुदेसाई याने दि.२९/०१/२०२२ रोजी जमिनीचे कुंपण तोडले असा अर्ज त्यांनी दाखल केला आहे, सदर अर्जामध्ये त्यांनी अनंत प्रभुदेसाई यांनी दावा मिळकत जमिनीमध्ये त्यांनी येवू नये अशी ताकीद मागितली होती, रे.दि.मु.नं.४७/२०१९ या केसमधील कागदपत्र पोलीसांनी याकामी दाखल केलेली आहेत, जमिनीला लागून एक नवलामंदिरकडे रसता जातो व दुसरा बौध्दमंदिराकडे जातो व एक बाजारवाडीकडे जातो, कथित घटनास्थळी चौक असल्यामुळे तेथे लोकांची सतत वर्दळ असते, रस्त्यावरुन कथीत घटनास्थळ हे सहज दिसण्यासारखे आहे.

**११.** साक्षीदार पुढे सांगते की, घटना नेमकी किती तारखेला घडली हे तिला आठवत नाही, पुढे साक्षीदार सांगते की, जी काही कथित घटना घडली ती उन्हाळयाच्या मे महिन्यात घडली. साक्षीदार पुढे हे मान्य करते की, आर्टीकल 'अ' वाडीमध्ये सहजपणे कोठेही उपलब्ध होवू शकतात, शितल कोटकर यांच्या त्यांच्या समाजातील आहेत, ज्या ज्या वेळी त्या अनंतच्या विरोधात तक्रार दिली होती त्या प्रत्येक वेळी शितल या त्यांच्यासोबत होत्या, रत्नागिरी येथील केसमधील शितल कोटकर या साक्ष दयायला आल्या होत्या, रे.दि.मु.नं.४७/२०१९ या दाव्यामध्ये प्रदीप कांबळे हे देखील प्रतिवादी आहेत, सानिया कांबळे ही प्रदीपची मुलगी आहे, जयश्री कांबळे, सानिया कांबळे, विलास जाधव, प्रज्ञा कांबळे, सारिका जाधव, शिवराम कोटकर, प्रमेय जाधव, विलास जाधव हे सर्व त्यांच्या समाजातील आहेत, पोलीस दवाखान्यात आले त्यावेळी शितल ही देखील

त्यांच्यासोबत दवाखान्यात होती, पोलीसांनी सरकारी दवाखान्यामध्ये त्यांच्याकडे कोणतीही चौकशी केली नाही, आर्टीकल अ ला दोन बाजू असून एका बाजूला धार आहे व दुसऱ्या बाजूला धार नाही, त्यांचे म्हणणेप्रमाणे अनंत यांनी त्यांना कोयत्याच्या कुठल्या बाजूने मारले हे सांगता येणार नाही.

**११.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार शिवराम बुधाजी कोटकर (अ.सा.क्र.२) यांचा निशाणी क्र.२६ येथे नोंदविलेल्या सरतपासामध्ये त्यांनी असे कथन केले आहे की, दि.२७/०९/२०२२ रोजी पोलीस श्री. तळकेर यांनी पंचनामा करण्यासाठी वनिता जाधव यांच्या गट क्र.७८ येथील शेताजवळ पंच म्हणून बोलविले होते. त्यानुसार ते घटनास्थळी गेले असता तेथे इतर पंच उपस्थित होते असून तेथे गेल्यानंतर पोलीस श्री. तळेकर यांनी त्यांना छाप्याचा उद्देश समजावून सांगितला. त्यानंतर त्यांचेसमक्ष पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला व त्यावर त्यांच्या पंच म्हणून सहया घेतल्या. सदर साक्षीदाराचा आरोपीतर्फे घेणेत आलेल्या उलटतपासाचे अवलोकन केले असता त्यामध्ये साक्षीदाराने हे मान्य केले की, शितल कोटकर ही त्याची पत्नी असून ती पोलीस पाटील, आहे, फिर्यादी व आरोपी यांचेमध्ये गेली अनेक वर्ष जमिन जागेवरुन वाद आहेत, ज्या-ज्या वेळी फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये वाद झालेले आहेत त्या त्या वेळी त्याची पत्नी फिर्यादीसोबत पोलीस ठाण्यामध्ये गेलेली आहे. साक्षीदार पुढे हे देखील मान्य करतो की, त्याने यापूर्वी आरोपी विरोधात कोर्टात साक्ष दिलेली आहे, पोलीसांनी त्याचेसमोर कोणतेही फोटो काढलेले नाहीत.

**१२.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार विलास केशव नारकर (अ.सा.क्र.३) यांचा निशाणी क्र.२९ येथे व साक्षीदार सचिन शांताराम रांबाडे (अ.सा.क्र.४) यांचा निशाणी क्र.३१ नोंदविलेल्या सरतपासामध्ये त्यांनी असे कथन केले आहे की, दि.०१/१०/२०२२ रोजी त्यांना एका पंचनाम्यावर त्यांना सही करण्यास सांगितल्यामुळे त्यांनी सही केली, त्यातील मजकूराबाबत त्यांना काहीच माहित नाही. सदर साक्षीदारांनी

अभियोगपक्षास सहाय्य केलेले नसल्यामुळे सरकार पक्षातर्फे विधिज्ञ यांनी साक्षीदारांना उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारले असता देखील साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहाय्यकारी ठरेल अशी साक्ष दिलेली नाही.

**१३.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार प्रज्ञा प्रमोद कांबळे (अ.सा.क्र.५) यांचा निशाणी क्र.३६ येथे नोंदविलेल्या सरतपासामध्ये त्यांनी असे कथन केले आहे की, दि.२७/०९/२०२२ रोजी ती तिचे घरी असताना सकाळी ०८.३० वाजता वनिता भिकाजी जाधव शेतात काम करीत असताना आरोपीने तिला मारले व ओढत रस्त्यावर तिचे घरासमोर आणले, त्यावेळी फिर्यादी ओरडत होती म्हणून ती बाहेर आली व तिने पाहिले की, फिर्यादी रस्त्यावर पडली त्यावेळी आरोपी तेथून निघून गेले होते. त्यानंतर वाडीतील सर्वजण जमले व पोलीस पाटील शितल कोटकर यांना फोन केल्यानंतर ते तेथे येऊन वनिता हिला पोलीस ठाण्यात घेवून गेले. भांडण कशावरुन झाले होते याची कल्पना तिला नाही. पोलीसांनी तिचेकडे कोणतीही चौकशी केली नव्हती व तिचा कोणताही जबाब नोंदविला नव्हता. आरोपीतर्फे घेणेत आलेल्या उलटतपासामध्ये साक्षीदाराने हे मान्य केले की, वनिता जाधव ही तिच्या वाडीतील व समाजातील आहे, या कामातील साक्षीदार हे तिचे वाडीतील व समाजातील आहेत, वनिता जाधव व आरोपींमध्ये जमिनीच्या कारणावरुन बरेच वर्षे वाद सुरु आहेत, प्रदिप कांबळे व आरोपी यांचमध्ये देखील जमिनीवरुन वाद आहेत, तिच्या घरातून वनिताचे शेत दिसत नाही.

**१४.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार सारिका प्रभाकर जाधव (अ.सा.क्र.६) हिचा निशाणी क्र.३७ येथे नोंदविलेल्या सरतपासामध्ये त्यांनी असे कथन केले आहे की, दि.२७/०९/२०२२ रोजी ती तिच्या घरी असताना सकाळी ०८.३० वाजता तिने वनिता हिचा ओरडण्याचा आवाज ऐकल्यामुळे ती तेथे गेली. तिने पाहिले की, तेथे आरोपी हे वनिता हिला कोयतीने मारत होते. त्यावेळी वनिता हिच्या उजव्या हाताच्या अंगठयाजवळ लागले होते व रक्त येत होते. त्यावेळी पोलीस पाटील शितल कोटकर यांना

त्या बोलवायला गेल्या होत्या. त्यानंतर पोलीस घटनास्थळी आले, त्यानंतर त्या घटनास्थळावरुन निघून गेल्या. पोलीसांनी तिचेकडे घटनेबाबत कोणतीही चौकशी केली नव्हती व तिचा जबाब लिहून घेतला नव्हता.

**१५.** आरोपीतर्फे घेणेत आलेल्या उलटतपासामध्ये साक्षीदार सारिका प्रभाकर जाधव (अ.सा.क्र.६) हिने हे मान्य केले की, शितल कोटकर या त्यांचे गावच्या पोलीस पाटील नसून त्या बाजूच्या तळवडे गावच्या पोलीस पाटील आहेत, शितल कोटकर या त्यांचे समाजातील आहे, त्यांचे गावचे पोलीस पाटील विजय सुतार आहेत. सदर साक्षीदार हिचे म्हणण्यानुसार, आरोपी वनिता हिला मारताना तिने एकटीनेच पाहिले होते व आरोपींनी वनिताला मारताना पाहिल्याची बाब तिने पोलीसांना सांगितली नव्हती. साक्षीदार पुढे हे मान्य करते की, तिच्या घराच्या अंगणातून कथित घटनास्थळ दिसत नाही, कथित घटनास्थळी चार रस्ते एकत्र येऊन मिळतात व तेथे सकाळी अनेक लोकांची ये-जा चालू असते, वनिता जाधव व आरोपींमध्ये जमिनीच्या कारणावरुन बरेच वर्षे वाद सुरु आहेत, वनिता हिने आरोपीविरुध्द अनेक केसेस दाखल केलेल्या आहेत, सदरचे दोघांमधील वाद जमिनीवरुन आहेत.

**१६.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार डॉ. राजकुमार शिवाजीराव चव्हाण (अ.सा.क्र.७) यांचा निशाणी क्र.४० येथे नोंदविलेल्या सरतपासामध्ये त्यांनी असे कथन केले आहे की, दि.२७/०९/२०२२ रोजी ते राजापूर ग्रामीण रुग्णालयामध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत असताना त्यादिवशी सकाळी १०.०० वाजण्याचे दरम्याने त्यांनी वनिता भिकाजी जाधव यांची तपासणी त्यांनी केली होती. त्यांची तपासणी करुन त्यानुसार त्यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र(नि.क्र.४१) दिले. आरोपीतर्फे घेणेत आलेल्या उलटतपासामध्ये साक्षीदाराने हे मान्य कले की, त्यांनी दिलेल्या वैदयकीय प्रमाणपत्रामध्ये हल्ल्याचा इतिहास त्यांनी नमुद केलेला नाही, त्यांचे वैदयकीय प्रमाणपत्रामध्ये सदरची दुखापत काही कारणामुळे होऊ शकते असे नमूद केलेले आहे, कोयता हा तीक्ष्ण

वस्तूंच्या श्रेणीत येतो.

**१७.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार कमलाकर रघुनाथ तळेकर (अ.सा.क्र.८) यांचा निशाणी क्र.४३ येथे नोंदविलेल्या सरतपासामध्ये त्यांनी असे कथन केले आहे की, दि.२७/०९/२०२२ रोजी ते रायपाटण पोलीस ठाण्यामध्ये पो.हे.कॉ. अधिकारी म्हणून कार्यरत असताना गु.र.नं.१७७/२०२२ च्या तपासकामाचे आदेश त्यांना प्राप्त झालेवरुन त्यांनी दोन पंचांचे समक्ष घटनास्थळी जावून पंचनामा (नि.क्र.४४)केला. त्यानंतर त्यांचे सोबत असलेले पोलीस श्री. कोळी यांनी घटनास्थळाचे एकूण ब-१ ते ब-४ असे चार फोटो काढले. सदर फोटोंबाबत श्री. कोळी यांचे भारतीय पुरावा कायदा कलम ६५-ब चे प्रमाणपत्र(नि.क्र.४५) घेतले होते. त्यानंतर त्यांनी साक्षीदारांकडे तपास करुन त्यांची तपास टिपणे नोंदविली. आरोपीस फौ.प्र.सं.कलम ४१(अ) ची नोटीस (नि.क्र.४६) दिली. त्यानंतर त्यांनी मुद्देमाल पोलीस ठाण्यात जमा करुन मुद्देमाल पावती(नि.क्र.४८) फाडली तसेच जखमींची वैदयकीय प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेतली व इतर सबळ पुरावा मिळून आल्याने दोषारोपपत्र दाखल केले.

**१८.** सदर साक्षीदार कमलाकर रघुनाथ तळेकर (अ.सा.क्र.८) याचा आरोपीतर्फे घेणेत आलेल्या उलटतपासामध्ये साक्षीदाराने हे मान्य केले की, एखादी मेडीको लिगल केस असल्यास तसे दवाखान्यामधून त्यांना लेखी कळविले जाते, कथित घटनास्थळाजवळ चार रस्ते एकत्र येतात, आरोपी व फिर्यादी यांचे दरम्यान जमिन जागेवरुन प्रकरणे चालू असल्याचे त्यांचे निदर्शनास आले होते, नि.क्र.५० व ५१ वरुन आरोपी व फिर्यादी यांचेमध्ये सन २०१९ सालापासून जमिन जागेवरुन वाद असल्याचे दिसून येते. साक्षीदार पुढे सांगतो की, या कामातील फिर्यादी यांनी आरोपी विरुध्द एट्रॉसिटी कायदयाअंतर्गत झालेल्या केसीसमध्ये आरोपीला मिळालेला जामीन रद्द करण्याकरीता अर्ज दाखल केला होता किंवा कसे याची त्याना माहिती नाही. साक्षीदार पुढे हे मान्य करतो की, या कामातील पंच शिवराम कोटकर यांच्या पत्नी शितल कोटकर

या देखील या कामात साक्षीदार आहेत, फिर्यादीने फिर्याद देताना कोयता कोणत्या बाजूला लागला हे सांगितले नाही, डॉक्टरांकडून देखील त्यानी त्याबाबत कोणतेही मत घेतलेले नाही, या कामातील साक्षीदार हे फिर्यादीच्या वाडीतील व समाजातील आहेत. उर्वरित मजकूर साक्षीदाराने नाकारला असल्याचे दिसते.

**१९.** वरील सर्व साक्षीदार यांचे साक्षीपुराव्यांचे अवलोकन केले असता कथित घटना व साक्षीदारांच्या साक्षीपुराव्यातील उलटतपासातील कबुल्या पाहता त्यामध्ये सुसंगता दिसून येत नाही. तसेच यातील घटनास्थळाचा पंचनामा शाबीत करणेकामी तपासण्यात आलेल्या पंच साक्षीदार विलास केशव नारकर (अ.सा.क्र.३) व सचिन शांताराम रांबाडे (अ.सा.क्र.४) यांच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता याकामी घटनास्थळाचा पंचनामा नि:संशयपणे शाबीत होतो असे म्हणता येणार नाही. तसेच याकामी घटनास्थळ पंचनाम्याचे पंच शिवराम बुधाजी कोटकर (अ.सा.क्र.२) यांनी पंचनाम्याला ते उपस्थित असल्याचे सांगितलेले आहे परंतू सदर साक्षीदाराच्या उलटतपासातील कबुल्या पाहता त्याच्या साक्षीवरुन भिस्त ठेवून पंचनामा निःसंशयपणे शाबीत होतो असे म्हणता येत नाही.

**२०.** प्रस्तुत केसकामी फिर्यादी साक्षीदार वनिता भिकाजी जाधव (अ.सा.क्र.१) हिने तिचे साक्षीपुराव्यात कथन केले की, पोलीस सरकारी दवाखान्यात किती वाजता आले ते सांगू शकत नाही तसेच ती सांगत होती व पोलीस लिहून घेत होते असे काही घडले नाही. तसेच सदर साक्षीदार हिने आरोपीतर्फे घेणेत आलेल्या उलटतपासामध्ये हे मान्य केले की, तिला घटना कोणत्या तारखेला घडली हे आठवत नाही तर पुढे साक्षीदार असे सांगते की, सदरची घटना उन्हाळयाच्या मे महिन्यामध्ये घडली होती. तर फिर्याद(नि.क्र.२१)चे अवलोकन असता सदरची फिर्याद ही दि.२७/०९/२०२२ रोजी दिल्याचे अभिलेखावरुन दिसून येते. साक्षीदार पुढे हे देखील सांगते की, पोलीसांनी सरकारी दवाखान्यामध्ये तिच्याकडे कोणतीही चौकशी केलेली नाही. या सर्व बाबींचा

विचार करता एकंदरीत अभियोगपक्षाच्या केसला दुजोरा मिळत नसल्योच दिसून येते.

२१. प्रस्तुत केसमधील साक्षीदार सारिका प्रभाकर जाधव (अ.सा.क्र.६) हिने तिचे सरतपासामध्ये आरोपीचा ओरडण्याचा आवाज ऐकून ती गेली असता तिथे फिर्यादीला आरोपी कोयत्याने मारत असल्याचे सांगते परंतू, सदर साक्षीदार घटनेचा संपूर्ण घटनाक्रम सांगत नाही तसेच सदर साक्षीदाराच्या उलटतपासातील कबुल्या पाहता त्यामध्ये तिने सांगितले की, वनिता हिला मारताना तिने एकटीनेच पाहिले होते तसेच साक्षीदार हे देखील मान्य करते की, आरोपी व फिर्यादीमध्ये पूर्वीपासून वाद आहेत. साक्षीदार प्रज्ञा प्रमोद कांबळे जाधव (अ.सा.क्र.५) हिने तिचे साक्षीपुराव्यात आरोपीने फिर्यादीला ओढत रस्त्यावर तिचे घरासमोर आणल्याचे सांगते तर सदरची बाब फिर्यादी वनिता जाधव (अ.सा.क्र.१) तिच्या पुराव्यात कुठेच आरोपीने तिला ओढत नेल्याचे सांगत नाही अथवा तसे इतर कोणाही साक्षीदाराचे तसे कथन नसल्याचे दिसून येते. सदर दोन्हीही साक्षीदारांच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता त्यांच्या साक्षीमध्ये विरोधाभास असल्याचे दिसून येते. जर साक्षीदार सारिका प्रभाकर जाधव (अ.सा.क्र.६) ही तिचे साक्षीपुराव्यात तिने फिर्यादी वनिता हिला मारताना एकटीनेच पाहिले होते असे म्हणत असेल तर मग इतर साक्षीदार प्रज्ञा प्रमोद कांबळे जाधव (अ.सा.क्र.५) ही तिने घटना पाहिल्याचे सांगत आहे ती बाब खरी आहे अगर कसे याबाबत शंका उपस्थित होते. त्यामुळे सदर दोन्हीही साक्षीदार यांच्या साक्षीमध्ये विरोधाभास दिसून असल्याने त्यांचा साक्षीपुरावा आक्षेपार्ह वाटत आहे. त्यामुळे अभिलेखावर आलेल्या साक्षीदारांच्या पुराव्यामधून सुसंगता कोठेच दिसून येत नाही याउलट साक्षीदारांनी केलेल्या विधांनांवरुन पुराव्यामध्ये तफावत असल्याचे दिसून येते.

२२. वरील सर्व बाबींवरुन याकामी सादर करण्यात आलेला साक्षीपुरावा, दर्शनीय परिस्थिती व अभियोगपक्षाची प्रस्तुतची तथाकथित केस यामध्ये सुसंगता दिसून

येत नाही. अशा परिस्थितीत याकामी अभियोगपक्षाची केस व याकामी नोंदविणेत आलेला साक्षीपुरावा यांमध्ये तफावत असल्याचे दिसत असल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर तथाकथित घटनेच्या सत्यतेबाबत संशयास वाव निर्माण होतो. त्यामुळे याकामी अभियोगपक्षाने सदर आरोपीनींच गुन्हयाचे कृत्य केले ही बाब सबळ व संयुक्तिक पुराव्यानिशी शाबीत केली असे म्हणता येणार नाही.

**२३.** प्रस्तुत केसमध्ये तथाकथित संपूर्ण घटनाक्रम पाहणारा कोणाही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराची साक्ष याकामी नोंदविलेली नाही. सदरचे गुन्ह्याचे कृत्य आरोपीनेच केले अगर कसे ही बाब दर्शविणारा कोणताही सबळ पुरावा याकामी नोंदविणेत आलेला नाही. याकामी नोंदविलेल्या साक्षीदारांच्या साक्षीपुराव्यावरुन यातील फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये घटनेच्या पूर्वीपासूनच जमिनीच्या कारणांवरुन वाद असल्याचे दिसून येते. प्रस्तुत केसकामी नोंदविणेत आलेल्या साक्षीदारांच्या साक्षीपुराव्यावरुन फिर्यादी व्यतिरिक्त अन्य कोणीही साक्षीदाराने तथाकथित घटनाक्रम त्यांचे पुराव्यात विशद केलेला नाही. तथापि, कोणत्याही साक्षीदाराने अभियोगपक्षाच्या केसप्रमाणे तथाकथित गुन्हयाचे आरोपींनी कृत्य करताना त्यांनी पाहिल्याचे कुठेही नमुद केलेले नाही. त्यामुळे फिर्यादीच्या कथनाप्रमाणे आरोपींनी तथाकथित गुन्हयाचे कृत्य केले ही बाब संशयापलिकडे सिध्द होते असे म्हणता येणार नाही.

**२४.** वरील चर्चेनुसार दिसून आलेल्या परिस्थितीत, अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची साक्ष ही आरोपींनी अभियोगपक्षाचे कथनानुसार गुन्हयाचे कृत्य केले असल्याचा निष्कर्ष काढणेसाठी निःसंशय सबळ पुरावा ठरत नाही. त्यामुळे, आरोपींनी अभियोगपक्षाचे कथनानुसार गुन्हयाचे कृत्य केले असल्याचे अभियोगपक्ष निःसंशयपणे सिध्द करु शकलेला नाही.

**२५.** उपलब्ध पुरावा पाहता तसेच उभय पक्षांच्या विधीज्ञांचे युक्तीवाद ऐकता हे निःसंशयपणे सिध्द होत नाही की, दि.२७/०९/२०२२ रोजी सकाळी ०८.३० वाजण्याच्या दरम्याने मौजे तळवडे, गुरववाडी येथील ठिकाण टेंब, कोंड्याचा माळ, ता. राजापूर येथे फिर्यादी कसत असलेल्या जमिनीमध्ये बोडश्याने (कोयत्याने) साफसफाई करीत असताना आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करुन तिचे डावे कानाजवळ गालावर व डोक्यात मागे हाताचे थापटाने मारहाण केली तसेच फिर्यादीचे हातातील बोडसा (कोयता) हिसकावून घेवून फिर्यादीचे उजवे हाताचे अंगठयावर मारला तसेच फिर्यादीस बोडसे (कोयता) हातात घेवून 'जर परत तु या जमिनीत आलीस तर तुला खल्लास करुन टाकीन' असे म्हणून शिवीगाळी केली व त्याद्वारे आरोपींनी भा.द.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला आहे. सबब, वरील कारणास्तव आरोपी यांना भा.द.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये दोषमुक्त करण्यात येते. त्यामुळे मुद्‌दा क्र.१ ते ४ चे निष्कर्ष मी नकारार्थी काढून मुद्दा क्र.५ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | आरोपी **अनंत मधुसुदन प्रभुदेसाई** याची भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २ | आरोपीचे जामीन विसर्जीत करण्यात येत आहे. |
| ३ | प्रस्तुत केसकामी जप्त करणेत आलेला मुद्देमाल नामे एक लोखंडी पाते असलेला बोडसा (कोयता) त्याचे पात्याची लांबी पावणे अकरा इंच असून पुढील टोके वक्राकार व निमुळते असलेला त्याचे आतील बाजूला धार असलेला, त्याची मुठ भगव्या रंगाची प्लॅस्टीकची असून तिची लांबी सव्वा पाच इंच असलेला जुना वापरता त्याची किं.सु.१५०/- हा अपिल कालावधीनंतर नियमाप्रमाणे लिलाव करुन त्यातून येणारी रक्कम सरकारी खाती जमा करणेत यावी. |

| | |
|---|---|
| ४ | आरोपीचे कलम ४३७-अ फौजदारी प्रकिया संहितेनुसार रु.१५,०००/- इतक्या रक्कमेचा पूर्वीचा वैयक्तीक जातमुचलका व जामीन बंधपत्र पुढे चालू ठेवणेत येते. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करणेत आला.)

SWARANJALI SUDHAKAR HAKKE

Digitally signed by SWARANJALI SUDHAKAR HAKKE
Date: 2026.03.09 18:30:09 +0530

**दिनांक- ०६/०३/२०२६** **(एस. एस. हाके)**

**राजापूर.** **न्यादंडाधिकारी प्रथम वर्ग, राजापूर.**

# CERTIFICATE

"Judgment/Order in :- Regular Criminal Case No. 61/2022

I affirm that the contents of this Pdf file judgment/order are same words as per original judgment/order.

Name of Stenographer:- M. N. Patil
Court Name :- Civil & Criminal Court, Rajapur.
Date of Decision :- 06-03-2026
Judgment signed by P.O. on :- 09-03-2026.
Judgment uploaded on :- 09-03-2026.